# नवजीवन विधी महाविदयालय, नाशिक

## अवयव दान

दि. ०८/०३/२०२५

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे , नवजीवन विधी महाविद्यालय नाशिक आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमानाने.

एकदिवसीय जिल्हास्तरीय अवयवदान जनजागृती कार्यशाळेचे आयोजन दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी नवजीवन विधी महाविद्यालयात करण्यात आले होते.


कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून नाईन प्लस हॉस्पिटल नाशिक चे संचालक आणि सुप्रसिद्ध किडनी विकार तज्ञ डॉ.नागेश अघोर व स्त्रीरोग तज्ञ डॉ.क्षमा अघोर तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रा.से.यो. जिल्हा समन्वयक डॉ. डी. के. आहेर उपस्थित होते.

सदर कार्यशाळेत नाशिक जिल्ह्यातील इतर महाविद्यालयातील रा.से.यो. स्वयंसेवकांनी सुद्धा सहभाग नोंदवला. व ठिक सकाळी 9:30 विद्यार्थ्यांचा नवजीवन विधी महाविद्यालयात सहभाग नोंदवला.

व पुढील कार्यक्रम सकाळी 10:00 वाजता एन . एस. एस. गीत व दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. नवजीवन विधी महाविद्यालयातील रा.से.यो. स्वयंसेवकांनी सर्व मान्यवर आणि इतर महाविद्यालयातून आलेल्या रा.से.यो. स्वयंसेवकांच स्वागत केल. कार्यक्रमाचं प्रास्ताविक नवजीवन विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे यांनी केले. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. शालिनी घुमरे यांनी महाविद्यालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

मुख्य कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात डॉ. नागेश अघोर यांनी अवयव दानाची माहिती कोणते अवयव दान करता येता व त्याबद्दल समज गैरसमज समजवण्यात आले , व विद्यार्थ्यांचे अवयव दान करण्याबद्दल प्रश्नांची उत्तरे व गैरसमज दूर करण्यात आले व त्यांनी अवयव दान बद्दल जनजागृती व उपस्थितांना मार्गदर्शन केले.

तसेच कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख मान्यवर व नवजीवन विधी महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे , रा. से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. शालिनी घुमरे यांनी मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाचे राष्ट्रगीत घेऊन सायंकाळी 5:00 वाजता कार्यक्रमाची सांगता केली.







08/03/25
N.S.S. P.O.(D-35)
Navjeevan Law College
CIDCO, NASIK

PRINCIPAL
Navjeevan Law College
CIDCO, NASHIK